**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 23.07.2019.**

पोलीस ठाणे पाचोड, जि.औरंगाबाद येथील शेख मुलकाम शेख हुसेन, वय 54, व्यवसाय नोकरी पोलीस हेड कॉन्सटेबल, ब.न.870, **यांना 10,000/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | शेख गुलफाम शेख हुसेन, वय 54, व्यवसाय नोकरी पोलीस हेड कॉन्सटेबल, ब.न.870, नेमणुक पोलीस ठाणे पाचोड, जि.औरंगाबाद, रा.प्लॉट न E-24, बेरीबाग, हर्सुल, औरंगाबाद. |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 23/07/2019 रोजी पोलीस ठाणे पाचोड येथील क्राईम रेकॉर्डचे कक्षात. |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 10,000/- रुपये |

याबाबत हकीगत अशी की, तक्रारदार यांचे मालकीची हायवा टिप्पर असुन ते शहागड ते औरंगाबाद असे वाळु वाहतुक करतात. दिनांक 16/07/2019 रोजी शहागड येथुन वाळुचा टिप्पर घेवुन ते औरंगाबादकडे जात असतांना पाचोडच्या समोर मुरमा फाटा येथे पाचोड पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी तक्रारदार यांचे टिप्पर अडवुन पोलीस ठाणे पाचोड येथे घेवुन गेले व तक्रारदार यांचे सोबतच्या तीन टिप्परवर असे एकुण सहा चालक मालकावर रेती चोरीचा गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयात तक्रारदार यांना अटक होऊन त्यांची 19/07/2019 रोजी जामिनावर सुटका झाली. तक्रारदार यांना जामिन मिळाल्यानंतर त्यांना पोचाड पोलीस ठाणेचे पोलीस हेड कॉन्सटेबल श्री. शेख साहेब याना वाळुचे टिप्पर सोडविण्यासाठी व तपासामध्ये मदत करण्याची विनंती केली असता शेख साहेब यांनी तक्रारदार यांना तुम्ही कोर्टामध्ये अर्ज करा व मला 10,000/- रुपये दया त्याशिवाय मी कोर्टाला तुमचे गाडी सुटण्यासाठी रिपोर्ट देणार नाही व तपासात मदत करणार नाही असे सांगीतले. तक्रार यांनी त्यांना माझ्याकडे ऐवढे पैसे नाहीत असे म्हणाले असता श्री शेख यांनी त्याना ते काही नाही तुला जर गाडी सोडायची असेल व तपासात मदत करायची असेल तर मला 10,000/- रु दयावे लागतील. अशी लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना पोलीस हेड कॉन्सटेबल श्री शेख यांना लाच देण्याची ईच्छा नसल्यांने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.23.07.2019 रोजी पोलीस ठाणे पाचोड येथे जावुन पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान पंचा समक्ष पोलीस हेड कॉन्सटेबल श्री शेख यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचा हायवा टिप्पर सोडविण्यासाठी व तपासात मदत करण्यासाठी 10,000/-रुपयाची मागणी करुन तक्रारदार यांचे कडुन दि.23/07/2019 रोजी पंचासमक्ष 10,000/- रुपये स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. श्री.शेख, पोलीस हेड कॉन्सटेबल, ब.न. 870, पोलीस ठाणे पाचोड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

(वि.ल.चव्हाण)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.